www.loksatta.com

मुंबई; बुधवार, २९ मार्च २००६

मुंबई, पुणे, नागपूर आणि अहमदनगर येथून प्रकाशित

लोकसत्ता

# श्रद्धा पुनर्वसन संस्थेचे कर्जतजवळ उपचार केंद्र

**मुंबई, २८ मार्च/प्रतिनिधी**

रस्त्यावरील निराधार मानसिक विकलांगांवर उपचार करून त्यांना पुन्हा त्यांच्या कुटुंबाकडे सोपविणाऱ्या श्रद्धा रिहॅबिलिटेशन फाऊंडेशन संस्थेने आता अशा रुग्णांच्या पुनर्वसनासाठी कर्जतजवळ एक उपचार केंद्र सुरू केले आहे. बाबा आमटे यांचे सुपुत्र प्रकाश आमटे यांच्या हस्ते गुढीपाडव्याला या उपचार केंद्राचे उद्घाटन होणार आहे.

दहिसर येथील एका रुग्णालयातून गेली १७ वर्षे या संस्थेचे कार्य सुरू होते. आतापर्यंत सुमारे नऊशे रुग्णांना या संस्थेने त्यांचे घर परत मिळवून दिले आहे. आता या संस्थेने कर्जतजवळ उभारलेल्या निवारा आणि उपचार केंद्रात मानसिक रुग्णांच्या पुनर्वसनासाठी शेतकी, दुग्धव्यवसाय व कुक्कुटपालन उपक्रमांचीही मदत घेतली जाणार आहे. सध्या या केंद्रात चाळीस रुग्णांवर उपचार सुरू आहेत. सुमारे ११० रुग्णांसाठी हे केंद्र आधार बनू शकेल, असा विश्वास संस्थेचे विश्वस्त डॉ. भरत वाटवानी यांनी एका पत्रकाद्वारे व्यक्त केला आहे. ■